पुण्य नगरी ▌ शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६

शहरात जयघोष

कोल्हापूर : शिवजयंतीनिमित्त शहरात विविध संस्था, संघटना, कार्यालयांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करण्यात आला.

विवेकानंद कॉलेज : विवेकानंद कॉलेजमध्ये इतिहास विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीप्रसंगी डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी केले. पन्हाळा येथे आयोजित पदयात्रेमध्ये एनएसएस स्वयंसेवक व एनसीसी विभागातील छात्र, तसेच प्रा. कॅप्टन सुनीता भोसले व डॉ. संदीप पाटील उपस्थित होते. इतिहास विभागातील डॉ. अनिल जांभळे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अश्विनी खवळे यांनी आभार मानले.